पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
( स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव )
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID : sp.jalgaon@mahapolice.gov.in
pileb.jalgaon@gmail.com

प्रति, -: प्रेस नोट :- दिनांक ०४.०१.२०२६

मा.संपादक ,

---------------

**विषय :- अवैध गुटखा वाहतुक करणारा इसम स्थानिक गुन्हे शाखेकडुन जेरबंद......**

--- ००० ---

मा.डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधिक्षक, जळगांव यांनी स्थानिक गन्हे शाखा, जळगांव येथील पथकास जळगांव जिल्हात अवैध गुटखा वाहतुक व विक्री करण्याकरीता प्रमाण वाढले असुन गोपणीय माहीती काढुन अशा लोकांवर पुढील योग्य ती कारवाई करा असे आदेशीत दिले होते.

मा.राहुल गायकवाड, नेम- वरिष्ट पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव यांना गोपणीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक संशयीत वाहन पांढ-या रंगाचे मारोती सुझुकी कंपणीची अरटीगा वाहन क्रमांक MH-४६Z१०६५ या वाहनात अवैध गुटख्याची वाहतुक होत असुन सदरचे वाहन हे मुक्ताईनगर शहरातुन ब-हाणपुर (म.प्र) ते छत्रपती संभाजी नगर या दिशेने जाणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली त्यावरुन, त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव कडील पथकास योग्य ती कार्यवाही करणे बाबत सुचना दिल्याने त्यावरुन

मिळालेल्या बातमी प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला पोहचुन त्यांना वर प्रमाणे माहीती देवुन स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव तसेच मुक्ताईनगर पोलीस स्टेशन कडील पथक बातमीप्रमाणे पुरनाड फाटा, या ठिकाणी जावुन थांबलो असता वरील वर्णनाचे व क्रमाचे संशीयत वाहन हे भरधाव वेगात पुरनाड फाट्याकडे येतांना दिसले त्यावरुन आम्ही वाहनातील चालकास हात देवुन थांबविण्याचा प्रयत्न केला परंतु तो भरधाव वेगात खामखेडा गावाकडे निघुन गेला. त्यावरुन वरील पथकाने वाहनाचा पाठलाग करुन वरील क्रमांचे वाहन पांढ-या रंगाचे मारोती सुझुकी कंपणीची अरटीगा वाहन क्रमांक MH-४६Z१०६५ चे वाहन थांबवुन वाहन अवैध गुटखा असल्याने वाहनातील चालक यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव **अरबाज नौशाद बेग वय-३० वर्षे रा-काझी, हाऊस, खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर** असे सांगीतल्याने त्यांचे ताब्यातुन खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१)१०,१९,०२०/- (दहा लाख एकोनविस हजार विस रुपये) किमतीचा रजनीगंधा सुंगधीत पानमसाला व करमचंद प्रिमियन पान मसाला, मिराज तंबाखु, विमल पान मसालास, पानपराग पान मसाला, जाफराणी जार्दा व ताब्यातील वाहन तसेच मोबाईल फोन असा मुद्देमाल ताब्यात मिळुन आला.

सदरची कारवाई ही.मा.डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव, मा. अशोक नखाते, अपर पोलीस अधिक्षक, जळगांव तसेच मा.सुभाष ढवळे उपविभागीय पोलीस अधिकारी मुक्ताईनगर भाग,मुक्ताईनगर मा. श्री राहुल गायकवाड, वरिष्ट पोलीस निरीक्षक स्था.गु.शा जळगांव व आशिष आडसुळ पो.नि. मुक्ताईनगर पो.स्टे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

सदरची कारवाई स.पो.नि जयेश पाटील, पोउनि. निलेश गोसावी, दोन्ही नेम- मुक्ताईनगर पो.स्टे, पोह. विजय पाटील, श्रीकृष्ण पाटील, प्रेमचंद सपकाळे, विनोद पाटील, रविंद्र चौधरी, सलिम तडवी, छगन तायडे, रतनहरी गिते, हेंमत पाटील, सर्व नेमणुक-स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव व पो.अं. गोविंद सुरवाडे, गोविंद पवार नेमणुक- मुक्ताईनगर पोलीस स्टेसन अशांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव

